ePaper

## शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशींची प्रकृती बिघडली



| वर्ष - 7 | अंक -27 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- अजितदादांकडून निष्ठावंतास न्याय!
- इलेक्ट्रिक वाहन धारकांसाठी खुशखबर


www.mahaenews.com | बुधवार, दि. 24 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पिंपरीतील सोन्या तापकीर हत्या प्रकरणात धक्कादायक माहिती



# मित्रानेच केला गेम!

## » मित्राची वाढती प्रतिष्ठा बघवेना... आणि काढला मित्राचाच काटा

**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**पिंपरी चिंचवड परिसरातील चिखली येथे सोमवारी दुपारच्या सुमारास गोळीबार करून एकाचा खून करण्यात आला होता. या खुनामुळे पिंपरी चिंचवड शहरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र या खूनाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. जवळच्या मित्रानेच तरुणाचा 'गेम' केल्याचा दावा केला जात आहे. याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे**





पिंपरी चिंचवडमधील चिखली भागातील मंदिराजवळ कृष्णा उर्फ सोन्या हरिभाऊ तापकीर (वय २० वर्ष) याचा भरदुपारी गोळीबार करून खून करण्यात आला होता. त्याच्यावर गोळी चालवणाऱ्या आरोपीचे नाव सौरभ उर्फ सोन्या पानसरे (रा. मोई, खेड) असून त्याचा साथीदार सिद्धार्थ कांबळे असल्याचे समोर आले आहे. अचानक घडलेल्या घटनेने चिखली परिसरात नागरिकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली होती.

दरम्यान खून केल्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले होते. पोलिसांची पथके त्यांच्या शोधासाठी रवाना झाली आहेत. पिंपरी चिंचवड शहरात गुन्हेगारी डोकेवर काढू लागली आहे. पोलिस प्रशासनाने यावर योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. साधारण गेल्या महिनाभरातली ही खुनाची तिसरी घटना आहे. काही दिवसांपूर्वी शिरगाव येथील सरपंचाचा भर चौकात खून करण्यात आला होता. त्यानंतर तळेगाव येथे जनसेवा समितीचे अध्यक्ष किशोर आवारे यांचा देखील दिवसाढवळ्या खून करण्यात आला होता.गुन्हेगारीने डोके वर काढले असल्याची चर्चा असतानाच आता भरचौकात तरुणावर गोळीबार करून खून करण्यात आला आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवडमधील वातावरण दहशतमय होऊ लागल्याची चर्चा आता सुरू झाल्या आहेत.



## मित्राची वाढती प्रतिष्ठा बघवेना

दांडियाच्या कार्यक्रमावेळी झालेल्या भांडणाचा आणि चिखली परिसरात वाढत चाललेली प्रतिष्ठा याचा राग मनात धरून मित्राने दुग्धव्यावसायिक तरुणाचा पिस्तुलातून गोळ्या झाडून खून केल्याचे समोर आले. कृष्णा उर्फ सोन्या हरिभाऊ तापकीर (वय २०, रा. महादेवनगर, चिखली) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी सौरभ उर्फ सोन्या पानसरे आणि त्याचा साथीदार सिद्धार्थ कांबळे (दोघे रा. फलकेवस्ती, मोईगाव, ता.खेड) याच्याविरोधात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सोन्याचे मामा राजेंद्र कैलास कार्ले (रा.३८, रा.चांदुस, ता.खेड) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

सोन्या तापकीर याचा दुग्धव्यवसाय होता. सोन्या आणि आरोपी सौरभ मित्र होते. मागीलवर्षी नवरात्र उत्सव दरम्यान विकास साने यांनी पाटीलनगर चिखली येथील मैदानावर दांडियाचे आयोजन केले होते. त्यावेळी सोन्या आणि सौरभ यांच्यात भांडण झाले होते. तसेच सोन्या याची चिखली परिसरात प्रतिष्ठा वाढत चालली होती. याचा राग मनात धरून आरोपी सौरभ याने सोन्याचा काटा काढण्याचा कट रचला. सोमवारी दुपारी सोन्या चिखली गावच्या कमानीसमोर थांबला होता. या वेळी दुचाकीवरून सौरभ हा त्याचा मित्र सिद्धार्थसह त्याच्याजवळ आला. त्यांनी पिस्तुलातून सोन्यावर दोन गोळ्या झाडल्या. गंभीर जखमी झालेला सोन्या रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. परिसरातील नागरिकांनी त्याला त्वरित नजीकच्या रुग्णालयात नेले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. चिखली पोलीस तपास करत आहेत.

# अजितदादांकडून निष्ठावंतास न्याय!

## नीरा बाजार समिती सभापतीपदी जगताप बिनविरोध; उपसभापतीवरून घोळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाविकास आघाडीचे निर्विवाद वर्चस्व असलेल्या नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापतीपद राष्ट्रवादीच्या पारड्यात पडले. राष्ट्रवादेच पुरंदर तालुक्याच्या माहूर या दुर्गम भागातील शरद नारायण जगताप यांची सभापतीपदी निवड करून विरोधी पक्षनेते अजित पवारांनी निष्ठावंतास न्याय दिला आहे. मात्र उपसभापतीपदावरून काँग्रेस व राष्ट्रवादीचा ताळमेळ बिघडल्याने पद तूर्तास रिक्त राहिले. पुढील बैठकीत ही निवड केली जाणार आहे.**



पुरंदर तालुक्यातील शंभर व बारामती तालुक्यातील बत्तीस गावांचा समावेश असलेल्या नीरा (NEERA) बाजार समितीत (BAZAR SAMITI) राष्ट्रवादी (NCP), काँग्रेस (CONGRESS) व ठाकरे गटाच्या महाविकास आघाडीने सर्व अठरा जागांवर निर्विवाद विजय मिळविला होता. भाजप व शिंदे सेनेच्या उमेदवारांचा सुफडा साफ केला होता. राष्ट्रवादीचे पुरंदरमधून पाच व बारामतीतून पाच असे दहा, तर काँग्रेसचे पुरंदरमधून आठ संचालक आहेत. पहिले सभापतीपद पुरंदरलाच मिळणार हे निश्चित होते. मात्र, काँग्रेसच्या की राष्ट्रवादीच्या वाट्याला येते, याचीच कार्यक्षेत्रात उत्सुकता होती.

आज सहायक निबंधक श्रीकांत श्रीखंडे यांच्या अध्यक्षतेखाली नीरा बाजार समितीच्या सासवड कार्यालयात निवडप्रक्रिया पार पडली. यामध्ये पक्षश्रेष्ठींच्या निरोपानुसार राष्ट्रवादीचे कार्यकर्ते शरद नारायण जगताप यांचा एकमेव अर्ज सभापतीपदासाठी दाखल झाला आणि त्यांची निर्धारित वेळेनंतर बिनविरोध निवड जाहीर झाली. मागील पंचवार्षिक कालावधीत काँग्रेस-राष्ट्रवादीचीच सत्ता होती. त्यावेळी पहिले सभापतीपद नंदकुमार जगताप यांच्या रूपाने काँग्रेसला मिळाले होते. यावेळी भाकरी फिरविल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादेच संचालक अधिक असणे व ग्रामपंचायत मतदारसंघात झालेल्या चुरशीच्या लढतीत बारामतीच्या एकगठ्ठा मतांनी विजय मिळाल्याने निर्णय झाला असावा.

### दाल में कुछ काला है...

अखेरपर्यंत उपसभापतीपदी कोण हा पेच सुटू शकला नाही. याबाबत नेमकी माशी कुठे शिंकली हे कळायला वाव नाही. परंतु बारामती तालुक्याला उपसभापतीपद द्यायचे यावरून चर्चा झाली. मात्र बारामती तालुक्यात फक्त राष्ट्रवादीचेच पाच संचालक आहेत. सभापती राष्ट्रवादीचा झाल्याने उपसभापती काँग्रेसचा होणे अपेक्षित होते. मात्र काँग्रेसला बारामतीत प्रतिनिधीत्वच नव्हते. पुरंदरमध्ये त्यांचे आठ संचालक आहेत. त्यापैकी एका नावावर एकमत का झाले नाही? की काँग्रेसला उपसभापतीपद मान्य नाही? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रदीप पोमण यांनी, सर्वसहमतीने सभापती निवड झाली, तशीच आता उपसभापती निवडही सर्वसहमतीने येत्या बैठकीत होईल, अशी मोजकी प्रतिक्रिया दिली. तर राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष माणिकराव झेंडे म्हणाले की, उच्चशिक्षित, होतकरू व्यक्तीस सर्वांनी मिळून सभापतीपदाची संधी दिली आहे.

---

## 'नक्षत्र दर्शन', 'कवडसे मनाचे' या काव्यसंग्रहांचे प्रकाशन उत्साहात



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुण्यातील प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट संजय पंडित यांनी लिहिलेल्या 'नक्षत्र दर्शन' आणि 'कवडसे मनाचे' या दोन कवितासंग्रहांचे प्रकाशन ज्येष्ठ कवि व गझलकार रमण रणदिवे आणि सुप्रसिद्ध संवादिनीवादक डॉ. अरविंद थत्ते यांच्या हस्ते झाले. न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथील गणेश ऑडिटोरियम मध्ये हा प्रकाशन सोहळा पार पडला.

या समारंभास तालयोगी पं. सुरेश तळवलकर, गायक पं. विजय कोपरकर, जलतरंगवादक मिलिंद तुळाणकर, तबलागुरू पं. सुरेश सामंत,ऑर्गनवादक राजीव परांजपे, तबलावादक पांडुरंग मुखडे, ज्येष्ठ व्हायोलिनवादक रमाकांत परांजपे, संवादिनीवादक व संगीत-अभ्यासक डॉ. चैतन्य कुंटे अशी संगीत क्षेत्रातील अनेक नामवंत दिग्गज उपस्थित होते. श्रीपाद उंब्रेकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## इलेक्ट्रिक वाहन धारकांसाठी खुशखबर

### शहरात ईव्ही चार्जिंग स्थानके उभारणीला वेग

।पुणे। महाईन्यूज

**ज्या इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीत वाढ होत असल्याने, 'महावितरण'कडून इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानकांच्या उभारणीला वेग दिला जात आहे. पुणे परिमंडळांतर्गत सध्या १५ इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानके कार्यान्वित झाली आहेत. आगामी काळात पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांसह लगतच्या राष्ट्रीय महामार्गांवर आणखी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानके उभारण्यात येतील, अशी माहिती 'महावितरण'चे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी दिली.**



सेनापती बापट रस्त्यावरील 'महावितरण'च्या गणेशखिंड उपविभाग कार्यालयाच्या परिसरात नव्या इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानकाचे उद्घाटन रेशमे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. 'महावितरण'चे पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार, अधीक्षक अभियंता शंकर तायडे, सतीश राजदीप, युवराज जरग, अरविंद बुलबुले, प्रवीण पंचमुख, डॉ. सुरेश वानखेडे आदी उपस्थित होते.

'राज्य सरकारने 'ई-वाहन' धोरणाद्वारे 'महावितरण'ची इलेक्ट्रिक वाहनांना चार्जिंग सुविधा पुरविण्यासाठी राज्य नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती केली आहे. ई-वाहनांचा वाढता वापर पाहता, 'महावितरण'कडून अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त चार्जिंग स्थानके उभारण्यास, त्यांना तत्पर वीजजोडणी देण्यास गती दिली जात आहे. त्यासाठी एक खिडकी स्वतंत्र संकेतस्थळ उपलब्ध केले आहे. इलेक्ट्रिक वाहनधारकांसाठी 'पॉवर ॲप' उपलब्ध करून दिले आहे. या ॲपमध्ये चार्जिंग स्थानकांची ठिकाणे, चार्जिंगसाठी लागणारा वेळ, वीजवापर, व्यवहारासाठी ई-वॉलेट आणि शिलकीची माहिती ग्राहकांना उपलब्ध होत आहे,' असेही रेशमे यांनी सांगितले.

### 15 उपकेंद्रांच्या ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्थानके

'महावितरण'च्या पुणे परिमंडलात १५ उपकेंद्रांच्या ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्थानके कार्यान्वित आहेत. यात संघवीनगर (औंध), रिजन्सी इन्फ्रा (ननावरे वस्ती, औंध), गणेशखिंड उपविभाग कार्यालय परिसर (सेनापती बापट रस्ता), अमर पॅरेडियम (बाणेर), बेंचमार्क उपकेंद्र (पुनावळे, मुंबई हायवे), प्राधिकरण स्विचिंग स्टेशन (पुनावळे मुंबई-पुणे हायवे), सीआयआरटी उपकेंद्र (कासारवाडी, पुणे-नाशिक हायवे), कुणाल आयकॉन स्विचिंग स्टेशन (पिंपळे सौदागर), सेक्टर १० स्विचिंग स्टेशन (भोसरी), सीडीसी स्विचिंग स्टेशन (स्पाइन रोड, शाहूनगर), ब्रह्मा सनसिटी (वडगाव शेरी), झेन्सार स्विचिंग स्टेशन (खराडी), कीर्ती कॅसल स्विचिंग स्टेशन (वडगाव शिंदे, लोहगाव), रेसकोर्स उपकेंद्र (रेस कोर्स), राजगुरुनगर उपकेंद्र (कडूस फाटा, चांडोळी, ता. खेड) येथील चार्जिंग स्थानकांचा समावेश आहे.

# तळवडेतील धोकादायक वीजवाहिन्या होणार भूमिगत!

## गणेशनगर-ज्योतिबानगरमध्ये कामाला सुरुवात

### आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळवडे आणि परिसरातील महावितरण प्रशासनाच्या उघड्यावरील वीजवाहिन्यांमुळे धोका निर्माण झाला होता. शॉर्ट सर्किटच्या घटना आणि औद्योगिक वीजपुरवठा विस्कळीत होत होता. यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी वीजवाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू करण्यात आले.**



भाजपा शहराध्यक्ष तथा भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने तळवडेतील गणेशनगर- ज्योतिबानगर परिसरातील वीजवाहिन्या भूमिगत करण्याचे काम पुणे जिल्हा नियोजन समितीच्या (DPDC) माध्यमातून सुरू करण्यात आले.

यावेळी यावेळी माजी नगरसेवक शांताराम भालेकर, स्वीकृत माजी नगरसेवक पांडुरंग भालेकर, रुपीनगर शिक्षण संस्थेचे सचिव एस. डी. भालेकर, संचालक बंडुशेठ भालेकर, भाजपाच्या कोशागार अस्मिता भालेकर, केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक धनंजय वर्णेकर, महावितरणचे कनिष्ठ अभियंता अनिल हुलसुंदर यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

माजी नगरसेवक शांताराम भालेकर म्हणाले की, तळवडे येथे गणेशनगर- ज्योतिबानगर भागातील महावितरण वीजवाहिन्या भूमिगत करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होती. त्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून या कामाचा पाठपुरावा करुन आता वीजवाहिनी भूमिगत करण्याचे काम सुरू झाले. आगामी १५ दिवसांत हे काम पूर्ण होईल.

> **“तळवडे-रुपीनगर भागात गणेशनगर आणि ज्योतिबानगर येथील स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार वीजवाहिन्या भूमिगत करण्यात येत आहेत. नागरी वस्तीमध्ये वीजवाहिन्या उघड्यावर असल्यामुळे धोका निर्माण झाला होता. वीजवाहिन्या भूमिगत केल्यामुळे सुमारे २० हजार लोकसंख्या आणि औद्यागिक क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. तसेच वीज चोरीसारख्या घटनांना आळा बसणार आहे. सदर काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे, अशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.**
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# जमली गप्पांची मैफिल, भरला २१ वर्षांनी शाळेचा वर्ग !

## श्री. भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

। भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शाळेची घंटा वाजली आणि माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या वर्गात गर्दी केली. निमित्त होते, भोसरी येथील श्री रंगदास स्वामी शिक्षण विकास मंडळ संचलित श्री. भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळेत आयोजित माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे.**

हे माजी विद्यार्थी थोडीथोडक्या नव्हे तर तब्बल २१ वर्षांनी एकमेकांना भेटले होते. शाळेतील जुन्या आठवणी, तसेच सेवानिवृत्त झालेल्या आपल्याला शिकविणाऱ्या शिक्षकांची झालेली भेट यामुळे सारे वातावरण भावुक झाले होते. एकाच बेंचवर बसणारे मित्र बऱ्याच कालावधीनंतर एकत्र आल्यामुळे त्यांची गप्पांची छान मैफील जमली होती. या शाळेचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवत असून रविवारी (२१ मे ) या माजी विद्यार्थ्यांचा जणू मेळाच भरला होता. माणूस कितीही मोठा झाला तरी तो आपल्या शाळेला विसरत नाही. जिथे अभ्यासाचे धडे गिरवून जीवनात यशस्वी झालो. ती पवित्र शाळा, तेथील शिक्षक आणि जिवाभावाची मित्रमंडळी यांची पुन्हा एकदा भेट घडवण्याचा हा सोहळा माजी विद्यार्थ्यांनी केला. थोडी थोडक्या नव्हे तर तब्बल २१ वर्षांनंतर शाळेमध्ये सन २०००-२००१ च्या मॅट्रीक



बॅचचा वर्ग पुन्हा एकदा भरला होता. सकाळी १० वाजता धावडेवस्ती येथील शाळेत सर्वजण जमले. शाळेची घंटा वाजवून सामुहिकरित्या राष्ट्रगीत घेण्यात आले. त्यानंतर सभागृहात झालेल्या कार्यक्रमात शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षकांचा हृदय सत्कार या माजी विद्यार्थ्यांनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजू रासकर, रवी रासकर, सपना माळी, गणेश लांडगे, साधना माळी, आशिष ढमाले आदींनी परिश्रम घेतले. तर हे ४२ विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने प्रथमच एकत्र आले होते. यानिमित्ताने मुख्याध्यापक अनिल शेलार, अनिल महापुरे, भास्कर शिंदे, आणि गाडेकर सर यांनी मार्गदर्शन केले. वैभव वेदपाठक यांनी सूत्रसंचालन केले.

# विद्यापीठांच्या परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले




धोरणात्मक पातळीवर विद्यार्थिकेंद्री शिक्षणाचा सातत्याने उल्लेख केला जात असला, तरी प्रत्यक्षात आपल्याकडील शिक्षण यंत्रणाकेंद्री आहे. सरकारी कार्यालयांमधील नोकरशहा आणि विद्यापीठांतील कर्मचारी यांमध्ये मूलत: काहीही फरक नाही. दोन्ही यंत्रणा सारख्याच अकार्यक्षम आणि उत्तरदायित्व झटकणाऱ्या. सेवा हमी कायदा वगैरे लागू करण्यात आला असला, तरी कार्यक्षमतेत दखलपात्र सुधारणा नाही. विद्यापीठांच्या परीक्षा हे याचे उत्तम उदाहरण. कोव्हिड साथरोग सुरू झाल्यापासून राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षांचे वेळापत्रक जे कोलमडले आहे, ते अद्याप पूर्ववत झालेले नाही. कोव्हिडची साथ आटोक्यात आल्यानंतर एक संपूर्ण शैक्षणिक वर्ष संपत आले; परंतु परीक्षांची घडी अद्याप विस्कटलेली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील बहुतेक विद्यापीठांत विविध अभ्यासक्रमांसाठी २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाची पहिली सत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये झाली. आता दुसरे सत्र सुरू होऊन महिना-दीड महिना लोटला, तरी अनेक अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले नाहीत. दुसरी सत्र परीक्षा जुलैमध्ये होण्याची शक्यता असून, आताचा अनुभव पाहता त्याचे निकाल लागण्यास सप्टेंबर उजाडण्याची चिन्हे आहेत. पदवीच्या वा पदव्युत्तर वर्गांच्या शेवटच्या वर्षांना असणारे विद्यार्थी करिअरचे नियोजन करीत असतात; त्यांना पुढील शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी निकाल वेळेवर हवे असतात. मात्र, त्याची फिकीर यंत्रणांना दिसत नाही. परीक्षांचे निकाल ३० ते ४५ दिवसांत लावण्याचा नियम असतानाही, विविध कारणे देत विद्यापीठे आपापल्या सोयीने



निकाल जाहीर करीत आहेत. परीक्षांच्या निकालांना होणाऱ्या या अक्षम्य दिरंगाईबद्दल कुलगुरूंना जबाबदार धरण्याची राज्यपाल आणि कुलपती रमेश बैस यांनी कुलगुरूंना जबाबदार धरण्याची भूमिका या पार्श्वभूमीवर स्वागतार्ह ठरते. खुद्द कुलपतींनीच कुलगुरूंचे अशा प्रकारे कान टोचल्यानंतर तरी विद्यापीठांतील परीक्षा यंत्रणा गंभीर होतात की वेगवेगळ्या सबबी देऊन दिरंगाईचे समर्थन करतात, हे पहावे लागेल. वास्तविक कोव्हिडची साथ केवळ महाराष्ट्रात नव्हती; ती देशात आणि जगातही होती. मात्र, अन्य राज्यांतील, तसेच जगभरातील विद्यापीठांनी त्याचा परीक्षा आणि त्याच्या निकालांवर परिणाम होऊ न देण्यासाठी अधिक प्रयत्न केले. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, तसेच युरोपीय देशांत उच्च शिक्षणासाठी जाऊ इच्छिणाऱ्या किंवा देशांतर्गत अन्य विद्यापीठांच्या प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अंतिम वर्षाचा निकाल वेळेवर मिळणे आवश्यक असते; तसे न झाल्यास त्यांचे शैक्षणिकवर्ष वाया जाण्याचा धोका असतो. आपल्या विद्यापीठांतील यंत्रणांना याची निश्चितच कल्पना असणार. मात्र, मनुष्यबळाची अडचण, शिक्षकांचा असहकार आदी विविध कारणांमुळे निकालांना विलंब होत गेला. पुढील सत्र परीक्षांमध्ये असे होणार नाही, यासाठी कुलगुरूंनी यंत्रणेसा चालना देण्याची गरज आहे. उत्तरपत्रिका तपासण्यातील निष्काळजीपणा दूर करणेही आवश्यक आहे. एका विषयात दोनशे विद्यार्थ्यांना शून्य गुण मिळाल्याचा दाखला खुद्द कुलपतींनीच दिला आहे. विद्यापीठांचा गैरकारभार यातून अधोरेखित होतो.राज्यातील कुलगुरूंची बैठक घेऊन कुलपतींनी परिस्थितीचा आढावा घेतला ते बरेच झाले. या बैठकीद्वारे कुलपतींनी छडी उगारल्याने परीक्षा निकालांसारखा महत्त्वाचा आणि संवेदनशील विषय ऐरणीवर आला आहे. परीक्षांच्या निकालांना होत असलेला विलंब अजिबात क्षम्य नाही. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यास अनेक अडचणींकडे कुलगुरूंनी या बैठकीत लक्ष वेधले असेल. मुंबई, पुणे, नागपूर आदींसह सर्व विद्यापीठांत शिक्षकांच्या निम्म्या जागा दीर्घकाळ रिक्त असणे विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहे. या जागा भरण्याचे आश्वासन सरकारकडून अनेकदा दिले गेले असले, तरी स्थितीत सुधारणा नाही. ती होण्यासाठी कुलपतींनी सरकारला जाब विचारण्याची वेळ आली आहे. या बैठकीस चार कुलगुरू प्रभारी होते. मुंबई, पुणे या राज्यातील प्रमुख विद्यापीठांत गेल्या वर्षभरापासून कुलगुरूंचे पद रिक्त आहे. ते भरण्याची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे हे मान्य; परंतु आधीच्या कुलगुरूंची मुदत संपण्याच्या सहा महिन्यांच्या आधीच नव्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू व्हायला हवी. ही बंद पडलेली पद्धत आता तातडीने सुरू करायला हवी. नवीन शिक्षण धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीचा मुद्दाही कुलपतींनी मांडला आहे. त्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने दिशा स्पष्ट केली असली, तरी याबाबत प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या मनात असलेली संदिग्धता दूर करण्याची गरज आहे. त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेऊन व्यापक मोहीम आखायला हवी.

## संपादकीय »

### बैलांच्या झुंजी

***बैलांच्या या खेळांवर बंदी आणण्यासाठी न्यायालयात धाव घेण्याचे प्रयत्न सुरू झाले २००६ पासून. तेही तमिळनाडूत, जेथे बैलांच्या झुंजी सर्रास लावल्या जात अशा मदुराई जिल्ह्यातून. मात्र जल्लीकट्टूसाठी २००९ मध्ये नियम बनवून तमिळनाडू सरकारने हे आक्षेप मिटवले. .***

वादाला खरा रंग चढला तो २०११ मध्ये, तत्कालीन पर्यावरणमंत्री जयराम रमेश यांनी या खेळांना परवानगी देणारी तरतूद रद्द केली तेव्हा. अखेर ७ मे २०१४ रोजी सर्वोच्च न्यायालयानेही २००९ मधील तमिळनाडूचे नियम अवैध ठरवून, अशा प्रकारच्या खेळांना बेकायदा ठरवले. बैल, रेडे आदींसाठी 'गोवंश' हा शब्द रूढ झाला तो २०१५ मध्ये, जेव्हा गोवंश हत्याबंदीचे कायदे राज्ये करू लागली तेव्हा. पण बैलांसाठी प्राणघातक ठरू शकणाऱ्या 'जल्लीकट्टू' झुंजीवर बंदी म्हणजे आमच्या परंपरांचा अपमान, या मताला केंद्र सरकारचा पाठिंबाच, त्यामुळे २०१६ च्या जानेवारीत केंद्राकडून कायद्यात दुरुस्त्या करून जल्लीकट्टूला मान्यता मिळाली. त्याच महिन्यात येणाऱ्या पोंगल सणाच्या सुमारास जल्लीकट्टूला उधाण आले. ते टिकले जुलैपर्यंतच.

**औद्योगिक क्रांतीनंतर खनिज इंधनांचा वापर वाढत गेला. यामुळे वातावरणात हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत चालले आहे आणि पृथ्वीच्या सरासरी तापमानात वाढ होते आहे. सन २१००पर्यंत तापमानात होणारी ही वाढ औद्योगिकीकरणाआधीच्या तापमानापेक्षा १.५ अंश सेल्सिअसच्या वर जाऊ न देण्यासाठी, पॅरिस कराराअंतर्गत जागतिक पातळीवर प्रयत्न होत आहेत;**

## नव्या शीतयुद्धाचा शंखध्वनी

'जी-७' या जगातील विकसित आणि एकेकाळच्या श्रीमंत देशांच्या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजेरी लावणे, तेथेच युक्रेनचे लढाऊ अध्यक्ष व्लाजिमिर झिल्येन्स्की यांनी येणे, तेथेच 'क्वाड' या राष्ट्रचतुष्टयाची बैठक होणे, नंतर मोदींनी प्रशांत महासागरातील १४ छोट्या देशांच्या परिषदेला हजेरी लावणे, अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनीही दक्षिण प्रशांत क्षेत्रातील १८ देशांच्या परिषदेला जाणे आणि या साऱ्या घडामोडींवर रशिया व चीन यांनी अत्यंत कडक शब्दांत टीका करणे, या साऱ्याचा अर्थ जगातील नव्या शीतयुद्धाची व्यूहरचना जवळपास पुरी झाली आहे, असा होतो. येत्या काही काळात जगात जागोजागी नवे संघर्ष उभे राहिल्यास नवल नाही. रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू झाले, तेव्हा भारताने आपल्या जुन्या अलिप्ततावादाला स्मरून दोघांपासून समान अंतर राखले. 'सांगेन गोष्टी युक्तीच्या चार' अशी भूमिका दोघांबाबतही घेतली. रशियाचा निषेध करायचे टाळले असले, तरी हा काळ युद्धाचा नाही, असे सुनावलेही. मात्र, आता या युद्धाला एक वर्ष उलटून गेले आहे. हा संघर्ष सुरू झाल्यापासून झिल्येन्स्की मोदींना भेटले नव्हते. ते हिरोशिमामध्ये भेटले. 'जी-७' गटातील कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ब्रिटन, अमेरिका हे सात देश आणि या गटासोबत असणारी युरोपीय युनियन हे सारे



युक्रेनसोबत आहेतच. मोदी तेथे पोहोचल्याने आणि त्यांचे या परिषदेत भाषण झाल्याने, भारताचा या संघर्षातला मूळ पवित्रा बदलून, तो आता 'दोस्त राष्ट्रां'च्या बाजूला झुकलेला दिसतो आहे. तसे होणे अटळही होते. रशिया आणि चीन यांच्यातील गेल्या काही दिवसांतील वाढती मैत्री व चीनने या संघर्षात ठामपणे रशियाच्या बाजूला उभे राहणे, हा जागतिक शांततेमधला एक मोठा अडथळा बनू शकतो.

टॉप ब्रँड्सच्या स्मार्ट टीव्हीवर 60% पर्यंत सूट मिळवा |

हिरोशिमात ही परिषद चालू असताना भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या राष्ट्रचतुष्टयाच्या प्रमुखांची भेट झाली. ही ४७ मिनिटांची भेट पूर्णपणे चीनकेंद्री झाल्याचे सांगण्यात येते. 'क्वाड' हा समूह चार देशांमधील सहकार्याविषयी (व चीनकेंद्री) आहे आणि त्यात युक्रेनचा मुद्दा येऊ नये, अशी भारताची आधी भूमिका होती. मात्र, ती टिकवून धरणे कठीण झालेले दिसते.

## || अभंगवाणी ||



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अर्थव्यवस्थेत भारताचे स्थान भक्कम!

## ऑस्ट्रेलियामध्ये पंतप्रधान मोदी यांचा विश्वास; भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात मैत्रीची ग्वाही

। सिडनी।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये भारताचे स्थान भक्कम असून जागतिक बँकेच्या अहवालानुसार प्रतिकूल परिस्थितीचा सामना करू शकणारा एखादा देश असेल तर तो भारतच आहे, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केला. ऑस्ट्रेलियाच्या दोन दिवसीय दौऱ्यामध्ये त्यांनी सिडनीमध्ये भारतीय समुदायाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात भारत-ऑस्ट्रेलिया मैत्रीची ग्वाही दिली.**



सिडनीमधील 'कुडोस बँक अरेना' स्टेडियममध्ये झालेल्या कार्यक्रमात ऑस्ट्रेलियातील भारतीय वंशाचे सुमारे २१ हजार नागरिक सहभागी झाले होते. पंतप्रधान मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी उपस्थितांना संबोधित केले. परस्पर आदर आणि विश्वास हा भारत-ऑस्ट्रेलिया संबंधांचा सर्वात मजबूत आणि मोठा पाया असल्याचे पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. सर्वात आव्हानात्मक काळामध्येही भारताने विक्रमी निर्यात केली. भारताकडे क्षमतेचा किंवा साधनसामग्रींचा अभाव नाही, असे सांगत देशाच्या स्थिर अर्थव्यवस्थेची ग्वाही पंतप्रधानांनी यावेळी दिली. ब्रिस्बेन येथे भारताचा वाणिज्य दूतावास सुरू करण्याची घोषणा करून मोदी यांनी भारतीय वंशाच्या नागरिकांच्या अन्य प्रलंबित मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

या कार्यक्रमात अल्बानीज यांनी मोदी यांचा उल्लेख 'बॉस' असा केला. मोदी जिथे जातील, तिथे त्यांचे रॉक स्टारसारखे स्वागत होते, असे ते म्हणाले. अमेरिकेचा गायक-संगीतकार ब्रुस स्प्रिंग्स्टीन याच्या कुडोस बँक अरेनामध्ये २०१७मध्ये झालेल्या कार्यक्रमाची आठवण काढत तशीच गर्दी आताही झाल्याचे अल्बानीज म्हणाले. स्प्रिंग्स्टीन हा चाहत्यांमध्ये 'बॉस' या नावाने प्रसिद्ध आहे. त्याच्या संदर्भात अल्बानीज यांनी मोदींना ही उपमा दिली. या कार्यक्रमात भारतीय आणि ऑस्ट्रेलियाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या कार्यक्रमांचे सादरीकरणही झाले.

### सिडनीमध्ये 'लिटल इंडिया'

पंतप्रधान मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अल्बानीज यांच्या उपस्थितीत पश्चिम सिडनीमधील 'हॅरिस पार्क' या भागाचे 'लिटल इंडिया' असे नामांतर करण्यात आले. हॅरिस पार्क हा सिडनीच्या उपनगराचा भाग तेथे होळी, दिवाळीसारखे महत्त्वाचे भारतीय सण आणि ऑस्ट्रेलियाचे राष्ट्रीय दिवस सारख्याच उत्साहाने साजरे केले जातात. दोन्ही देशांमधील भौगोलिक अंतर जास्त असले तरी हिंद महासागराने आपण जोडले गेलेलो आहोत. आपली जीवनशैली कितीही वेगळी असली तरी योग, क्रिकेट, टेनिस आणि चित्रपट हे दोन्ही देशांना एकमेकांशी जोडणारे दुवे आहेत.

> भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 'बॉस' आहेत. भारतीय वंशाच्या नागरिकांमुळे ऑस्ट्रेलिया अधिक समृद्ध झाला आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील द्विपक्षीय संबंध आणखी दृढ व्हावेत.
>
> – अँथनी अल्बानीज, पंतप्रधान, ऑस्ट्रेलिया

# आयएएस बनण्यासाठी सोडली १४ लाखांची नोकरी

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचा निकाल आज (२३ मे) लागला. या परिक्षेत दरवर्षीप्रमाणे बिहारच्या पोरांनी बाजी मारली. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बिहारच्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. ही परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची तयारी, त्याचे परिश्रम, परिक्षेसाठी केलेल्या तडजोडी या सामान्यांसाठी प्रेरणादायी गोष्टी ठरतात. अशीच काहीशी गोष्ट आहे बिहारच्या अनुनय आनंद याची. अनुनयचा देशात १८५ वा क्रमांक आहे. तो बिहारच्या मुजफ्फरपूरमधल्या सरैय्यातल्या अजीजपूर गावचा रहिवासी आहे.

अनुनयने त्यांचं प्राथमिक शिक्षण मुजफ्फरपूरमधूनच पूर्ण केलं. त्यानंतर त्याने बोकारे डीपीएसमधून अभियांत्रिकीचं शिक्षण घेतलं. तो १४ लाखांच्या वार्षिक पॅकेजवर एका मोठ्या कंपनीत काम करत होता. परंतु आयएएस अधिकारी होण्याचं स्वप्न त्याला सतावत होतं. त्यामुळे त्याने यूपीएससी करण्यासाठी नोकरी सोडून दिली.

अनुनयचे वडील मुन्ना प्रसाद बालू-गिट्टी यांचं छोटंसं दुकान आहे. तर त्याची आई रश्मी कुमारी या गृहिणी आहेत. अनुनयने न्यूज १८ हिंदीशी बोलताना सांगितलं की, हा त्याचा तिसरा प्रयत्न होता.

अनुनयचा १८५ वा क्रमांक आल्याने तो त्याच्या कामगिरीवर समाधानी नाही. कारण त्याला आयएएस अधिकारी व्हायचं आहे. १८५ व्या रँकमुळे त्याला आयपीएस व्हावं लागेल. त्यामुळे अनुनय म्हणाला मी पुन्हा एकदा ही परिक्षा देणार आहे.

अनुनय स्वतःच्या कामगिरीवर खूश नसला तरी त्याचे आई-वडील मात्र खूप आनंदी आहेत. अनुनयचे वडील म्हणाले, मला खूप आनंद झाला आहे, हा आनंद शब्दात सांगता येणार नाही. आमच्या मुलाने इंजिनिअरिंग केलं तेव्हाच समजलं होतं की तो भविष्यात काहीतरी मोठं करेल, कारण तो अभ्यासात खूप हुशार होता.

# जिंकलेल्या जागा वगळता उर्वरित २५ जागांच्या वाटपाची चर्चा व्हावी!

## महाविकास आघाडीतील वादावर अजित पवार यांचा तोडगा

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटकमहाविकास आघाडीत जागावाटपावरून तीन पक्षांची तोंडे तीन दिशांना असल्याने गेल्या निवडणुकीत तीन पक्षांनी जिंकलेल्या २३ जागा वगळता उर्वरित २५ जागांच्या वाटपावर आधी चर्चा करून मार्ग काढावा, असा तोडगा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सुचवला आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेने जिंकलेल्या १८, राष्ट्रवादीच्या चार तर काँग्रेसची एक अशा २३ जागांवर आधी चर्चा करायची नाही. उर्वरित २५ जागांची वाटणी करायची. हे करताना उमेदवार कोण हे बघून जागावाटप झाले पाहिजे, अशी भूमिका अजित पवार यांनी मांडली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस आणि शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट यांच्यात लोकसभेच्या प्रत्येकी १६ जागा असे सूत्र ठरले आहे का, या प्रश्नावर असे काहीही ठरलेले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. लोकसभेच्या जागावाटपाचे सूत्र मला माहीत नाही. उद्धव ठाकरे यांच्याशी माझे यापूर्वी बोलणे झाले असता त्यांनी जिंकलेल्या जागा आमच्याकडे राहाव्यात अशी इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर जागावाटपाविषयी चर्चा झालेली नाही. आम्ही सर्वांनी जिंकलेल्या जागा सोडून उरलेल्या २५ जागांवर सर्वप्रथम चर्चा केली जावी. त्यात कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील. कोणती जागा कोणत्या पक्षाला जाईल, हे ठरेल. नंतर प्रत्येक पक्षाने जिंकलेल्या जागांवर चर्चा करता येईल, असेही पवार यांनी सांगितले. पवार यांनी काँग्रेस पक्षाशी आघाडीत असताना जागावाटपाचा दाखला दिला. सन २००४, २००९ आणि २०१९ च्या निवडणुकीत आम्ही काँग्रेसबरोबर आघाडीत होतो. त्यावेळी काही जागांच्या अदलाबदलीवर चर्चा झाली होती, ही चर्चा संमतीने केली जात असे, असेही ते म्हणाले. महाविकास आघाडी कायम राहणार असून एकजुटीने आगामी निवडणुका लढणार हे मी तुम्हाला लिहून देतो. जे काही निर्णय होतील ते आमचे तीन पक्षाचे वरिष्ठ नेते घेतील आणि कार्यकर्ते त्याची अंमलबजावणी करतील, असेही पवार यांनी सांगितले.

# “टिंगल... मिंगल...” आलिया भट्टने उडवली पती रणबीरच्या चित्रपटाची खिल्ली



आलियाने रणबीरच्या आगामी चित्रपटावर मजेदार प्रतिक्रिया दिली आहे. (फोटो सौजन्य- लोकसत्ता ग्राफिक्स टीम)

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर लवकरच ‘तू झूठी मैं मक्कार’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन लव रंजन करत आहेत. तर श्रद्धा कपूर या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे. पण रणबीरची पत्नी आलिया भट्टने या चित्रपटाची खिल्ली उडवली आहे. सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत आलियाने रणबीरच्या आगामी चित्रपटावर मजेदार प्रतिक्रिया दिली आहे.

रणबीर कपूरच्या ‘तू झूठी मैं मक्कार’ चित्रपटाबाबत नवी माहिती आता समोर येत आहे. सुरुवातीला मेकर्सनी चित्रपटाच्या नावाची काही अक्षरंच चाहत्यांना सांगितली होती. त्यानंतर अनेकांना या चित्रपटाच्या नावाबद्दल अंदाज बांधायला सुरुवात केली होती. यावर अभिनेत्री आलिया भट्टनेही इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे.रणबीरच्या नव्या चित्रपटाच्या नावाबद्दल आलियाने अंदाज व्यक्त केला होता. त्यानंतर आता तिने इन्स्टाग्रामवर आपल्या मनातील गोष्ट शेअर केली आहे. जेव्हा ‘तू झूठी मैं मक्कार’चा टीझर प्रदर्शित झाला तेव्हा आलियाने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली होती. तिने या चित्रपटाची खिल्ली उडवताना लिहिलं, “माझा अंदाज खूपच जवळपास होता. फक्त सांगतेय.” आलिया भट्टने त्याआधी या चित्रपटाचं नाव ‘टिंगल जिंगल मिंगल मिंगल’ असं सांगितलं होतं. दरम्यान लव रंजन यांच्या रोमँटिक कॉमेडी चित्रपटात रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत.

# नोरानंतर रकुल प्रीतलाही ईडीनं पाठवलं समन्स



बॉलिवूड विश्वावर सध्या वादाचे ढग दाटत आहे. त्यातच काही कलाकारांची ईडीकडून चौकशाही सुरु आहे. आता यातून टॉलिवूडचे कलाकारही सुटलेले नाहीत. रकुल प्रीत सिंग ही मनोरंजन विश्वातील अशा अभिनेत्रींपैकी एक आहे जिने खूप कमी कालावधीत लोकांच्या हृदयात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.

रकुलने तिच्या छोट्या अभिनय कारकिर्दीत अनेक मोठ मोठ्या कलाकारांसोबत काम केले आहे. मात्र, ज्याप्रमाणे तिच नाव यशस्वी कलाकारांसोबत जोगलं जातं तसंच तिचं नाव वादातही कायम आहे. अलीकडेच रकुलचे नाव टॉलिवूड ड्रग्ज मनी लाँडरिंग प्रकरणात समोर आले आहे . त्यानंतर ईडीच्या वतीने तिला समन्स पाठविले आहे.

याआधीही रकुल प्रीत गेल्या सप्टेंबरमध्ये ईडीसमोर हजर झाली होती. आता पुन्हा एकदा तिला ड्रग्ज प्रकरणी 19 डिसेंबरला ईडीच्या कार्यालयात हजर व्हावे लागणार आहे. याआधीही ईडीकडून अनेक तेलुगू स्टार्सची चौकशी करण्यात आली आहे. ईडीने रकुलला समन्स बजावण्याची ही दुसरी वेळ आहे.

२०२१ सालीही चौकशी ..

एवढेच नाही तर २०२१ मध्ये ईडीने रकुल प्रीतचीही चौकशी केली होती. जर वृत्तांवर विश्वास ठेवायचा असेल तर, या प्रकरणातील कथित मनी-लॉंडरिंग या पैलूवर त्याची चौकशी केली जाईल. दाक्षिणात्य वाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, या प्रकरणी राणा दग्गुबती, पुरी जगन्नाथ, रवी तेजा, चार्मी कौर, नवदीप आणि इतर सेलिब्रिटींनाही नोटीस बजावण्यात आली आहे.

# क्रांती रेडकरला आठवले भगवान शंकर आणि श्रीराम



मुंबई: अभिनेत्री क्रांती रेडकर हिचे पती आणि एनसीबीचे माजी झोनल डायरेक्टर समीर वानखेडे अडचणीत सापडले आहेत. शाहरुख खान याचा लेक आर्यन खानला ड्रग्ज प्रकरणात सोडवण्यासाठी तब्बल २५ कोटींची लाच मागितल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. याप्रकरणामुळं त्यांच्यावर निलंबनाची टांगती तलवार आहे. सीबीआयनं समीर यांच्यासह अजून काही अधिकाऱ्यांविरोधात एफआयआर दाखल केला आहे. सलग दोन दिवस त्यांची चौकशीही करण्यात आली. या कठिण काळात क्रांती समीर वानखेडेंच्या पाठीमागे खंबीरपणे उभी आहे.

क्रांतीनं व्हिडिओ शेअर करत प्रत्यक्ष -अप्रत्यक्षपणे त्यांच्यावर केलेले आरोप हे चुकीचे असून हे सगळं एका षडयंत्राचा भाग असून काही जण ठरवून त्यांना त्रास देत असल्याचं तिनं म्हटलं आहे. तर नुकताच तिनं आणखी एक व्हिडिओ शेअर करत कलयुगाची एक गोष्ट शेअर केली आहे. जे लोक खऱ्या पणानं काम करतात, त्यांच्यावर दबाव टाकणाऱ्यांची संख्या जास्त आहे. पण अशा खऱ्या लोकांना त्रास देऊन त्यांना जेव्हा तोडलं जाईल, तेव्हा पापाचा घडा भरेल. ज्या दिवशी वाईट माणसांच्या पापाचा घडा भरेल तेव्हा देव स्वत: पृथ्वीवर येतील. तो दिवस आलाही. तेव्हा शंकर भगवान प्रलय करण्याच्या तयारीत होते. पण त्यावेळी प्रभु श्रीराम त्यांना थांबवतात. श्रीराम तेव्हा म्हणतात की, या पृथ्वीवर काही चांगले लोक देखील आहेत. त्यांच्यामुळं हे दुनिया सुरू आहे. आत्ताच प्रलय केला तर, चांगली माणसंही यात संपतील आणि त्यांचाही विनाश होईल.क्रांती पुढं म्हणते की, तात्पर्य हेच की ही पृथ्वी चांगल्या माणसांमुळं सुरू आहे. काही निवडक माणसं आहेत. आपण काय करायचं तर त्यांना साथ द्यायची.


# लग्नाला यायचं हं! सोनाक्षीची पोस्ट चर्चेत



बॉलीवूडची दबंग गर्ल म्हणून सोनाक्षीच्या नावाचा उल्लेख करावा लागेल. काही दिवसांपूर्वी सोनाक्षीचे नाव हे खान कुटूंबातील एका सदस्याशी जोडले गेल्यानं नेटकऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केले होते. सोनाक्षीची एक पोस्ट सध्या सोशल मीडियावर झाली असून त्याला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. सोनाक्षीनं इंस्टावर जो लूक शेयर केला आहे त्यामुळे ती आता लग्नाची तयारी करत असल्याचे दिसून आले आहे. त्या फोटोमध्ये ती एका ब्रायडल अवतारामध्ये दिसून येत आहे. चाहत्यांना तिचा तो लूक कमालीचा आवडला आहे. त्या फोटोच्या कॅप्शनमध्ये सोनाक्षीनं लिहिलं आहे की, मला आता लग्नाचे वेध लागले आहे. पण मी खूप साधारण वधू होईल असे मला वाटते. लग्नामध्ये देखील मला फार काही नटता येणार नाही. सोनाक्षीच्या त्या पोस्टला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे.सोनाक्षी पुढे म्हणते की, मी सगळ्यात जास्त माझ्या आईच्या जवळ आहे. तिचं आणि माझं नातं हे सर्वात जवळचे आहे. मला वाटतं माझी आई सर्वात सुंदर स्त्री आहे. मला तिचा अभिमान आहे. मला तर अनेकजण म्हणतात की, तू तुझ्या आईसारखी दिसते. सोनाक्षीनं शेयर केलेल्या त्या पोस्टवर नेटकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. सोनाक्षी तू आता लग्नाची तयारी सुरु केलेली दिसतेस. यासगळ्यावर दबंग अभिनेत्री सोनाक्षीनं शेयर केलेल्या पोस्टनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# प्रदर्शनानंतर 19 व्या दिवशीही बॉक्स ऑफिसवर द केरला स्टोरीचीच हवा

मुंबई- अभिनेत्री अदा शर्माची प्रमुख भूमिका असलेला 'द केरला स्टोरी' प्रदर्शित होऊन आज २० दिवस पूर्ण झाले आहेत. सुदीप्तो सेनच्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. केवळ १५-२० कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने १९ व्या दिवशीही चांगली कमाई केली आहे. यासह तिसऱ्या आठवड्यातही या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दबदबा निर्माण केला. सर्व वादविवाद आणि काही ठिकाणी बंदी असतानाही चित्रपट अजूनही तग धरुन आहे.



पहिला आठवडा - ७७.२१ कोटी,
दुसरा आठवडा – ८०.३६ कोटी,
शुक्रवार, १५ वा दिवस – ०५.५० कोटी,
शनिवार, १६ वा दिवस – ०८.५० कोटी,
रविवार, १७ वा दिवस - १०.०० कोटी,
सोमवार, १८ वा दिवस – ३.७५ कोटी रु
मंगळवार, १९ वा दिवस – ४.५० कोटी रु
१९ दिवसांत एकूण कमाई – १८९.७२ कोटी रुपये

## धोनीचा एक मास्टरस्ट्रोक

# गुजरातचा हुकमी एक्का मैदानाबाहेर!

### » चेन्नई सुपर किंग्जचा आयपीएलच्या हंगामात अंतिम फेरीत प्रवेश

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वातील चेन्नई सुपर किंग्जनं गुजरातला पराभूत करत आयपीएलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. चेन्नईची टीम आतापर्यंत दहाव्यांदा आयपीएलच्या अंतिम फेरीत पोहोचली आहे. काल रात्री झालेल्या आयपीएलच्या पहिल्या क्वालिफायरमध्ये चेन्नईनं गुजरातला पराभवाची धूळ चारली. गुजरातच्या संघासमोर चेन्नईनं १७३ धावांचं आव्हान ठेवलं होतं. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या चेन्नईनं ७ विकेटवर १७२ धावा केल्या होत्या.**



१७३ धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या गुजरातची सुरुवात अडखळत झाली. पॉवरप्लेमध्येच गुजरातनं दोन विकेट गमावत ४१ धावा केल्या होत्या. हा त्यांच्या यंदाच्या हंगामातील पॉवरप्लेमधील तिसरा कमी स्कोअर होता. शुभमन गिलनं ४२ धावा आणि राशिद खाननं ३० धावा करुन गुजरातसाठी लढण्याचा प्रयत्न केला पण त्यांना यश आलं नाही. राशिद खान ३० धावा करुन बाद झाला अन् गुजरातचा पराभव निश्चित झाला होता.

### हार्दिक पांड्याचं गणित फसलं

गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्यानं यापूर्वी आठ सामन्यांमध्ये टॉस जिंकला होता. कालच्या मॅचमध्ये देखील हार्दिक पांड्यानं टॉस जिंकला. टॉस जिंकल्यानंत हार्दिकला आठ पैकी सहा सामन्यामध्ये विजय मिळाला होता. त्या सहा सामन्यांमध्ये गुजरातनं प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाप्रमाणं क्वालिफायरच्या सामन्यात देखील हार्दिकनं पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेपॉकच्या धिम्या होणाऱ्या खेळपट्टीवर दुसऱ्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय गुजरातच्या अंगाशी आला.

### स्पिनर्सपुढं गुजरातची दैना

**» गुजरात टायटन्सला रविंद्र जाडेजा आणि महीष तीक्षणा या जोडीनं खरा दणका दिला. जाडेजानं दाशुन शनाका आणि डेव्हिड मिलर ला बाद केलं. त्यावेळी गुजरातची धावसंख्या ४ बाद ८८ इतकी होती. दुसऱ्या बाजूनं शुभमन गिल मैदानात असल्यानं गुजरातची बाजू वरचढ मानली जात होती. अशावेळी महेंद्र सिंह धोनीनं गोलंदाजीची जबाबदारी सर्वाधिक विश्वास असलेल्या दीपक चाहरच्या हातात दिली. दीपक चाहरनं अगोदर वृद्धिमान साहाला बाद केलं होतं. १४ व्या ओव्हरमध्ये धोनीनं दीपक चाहरला गोलंदाजी दिली. त्यानं ज्यासाठी धोनीनं गोलंदाजी दिली ते काम पूर्ण केलं. दीपक चाहरनं शुभमन गिलला ४२ धावांवर बाद केलं. इथूनच चेन्नईनं सामन्यावरील आपली पकड मजबूत केली.**

### गुजरातकडे अजून एक संधी

गुजरातच्या संघानं चेन्नई विरुद्ध पराभव स्वीकारला असला तरी त्यांचं स्पर्धेतील आव्हान संपलेलं नाही. गुजरातला अजून एक संधी असून मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपरजाएंटस यांच्यातील विजेत्या संघाविरुद्ध गुजरातची लढत होणार आहे. त्या लढतीत गुजरातनं विजय मिळवल्यास ते दुसऱ्यांदा आयपीएलच्या फायनल मध्ये पोहोचू शकतात.

---

## गुजरातला पराभवाचा धक्का, शुभमननं एकट्यानं किल्ला लढवला

। चेन्नई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

आयपीएलचं यंदाचं पर्व अखेरच्या टप्प्यात पोहोचलं आहे. आज चेन्नई सुपरकिंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यामध्ये क्वालिफायर १ ची लढत पार पडली. चेन्नईनं पहिल्यांदा फलंदाजी करताना ७ बाद १७२ धावा केल्या होत्या. ऋतुराज गायकवाडनं ६० धावा केल्या. तर डिवोन कॉन्वॉयनं ४० धावा केल्या. चेन्नईच्या दोन्ही सलामीवीरांनी ८७ धावांची सलामी दिली. यानंतर चेन्नईनं गुजरातपुढं विजयासाठी १७३ धावांचं आव्हान ठेवलं. पण, गुजरातमधील शुभमन गिल आणि राशीद खान वगळता इतर खेळाडू मोठी धावसंख्या उभारु शकले नाहीत. शुभमन गिलनं ४२ धावा केल्या तर राशिद खाननं ३० धावा केल्या. या दोघांशिवाय गुजरातचे



इतर खेळाडू फेल ठरले. चेन्नई सुपर किंग्जनं आजच्या विजयासह २०२३ च्या आयपीएलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गुजरातचा संघ पराभूत झाला असला तरी आयपीएल बाहेर गेलेला नाही. अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी त्यांच्याकडे अजून एक संधी आहे. मुंबई आणि लखनऊ यांच्यातील विजेत्यासोबत गुजरातची लढत होईल, त्या लढतीत विजय मिळवल्यास गुजरातचा संघ अंतिम फेरीत पोहोचू शकतो. गुजरातनं आजचा सामना जिंकून विजेतेपदाकडे एक पाऊल टाकण्याचा प्रयत्न होता.

## हार्दिकचा मास्टरस्ट्रोक! पाणी आणणाऱ्या महाराष्ट्राच्या दर्शन नळकांडेला खेळवलं, ठरला हिरो

### » चेन्नईच्या संघाला चांगलेच धारेवर धरले, सर्वांना धक्का दिला

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महेंद्रसिंग धोनीच्या चेन्नईविरुद्ध खेळताना गुजरातचा कर्णधार हार्दिक पंड्याने मास्टरस्ट्रोक खेळला. कारण संपूर्ण आयपीएलमध्ये पाणी आणणाऱ्या खेळाडूला महाराष्ट्राच्या दर्शन नळकांडेला खेळवलं आणि त्याने चेन्नईच्या संघाला चांगलेच झुंजवले. आपल्या पहिल्याच षटकात दर्शनने विकेट मिळवली होती. पण त्यावेळी नशिब बलवत्तर नव्हते. पण त्याने चेन्नईच्या संघाला चांगलेच धारेवर धरले आणि या सामन्यात तो हिरो ठरला.**



गुजरातचा कर्णधार हार्दिकने जेव्हा टॉस जिंकला तेव्हाच त्याने सर्वांना धक्का दिला होता. कारण हार्दिकने टॉस जिंकला आणि त्याने त्यावेळी आपण दर्शनला संधी देत आहोत, हे सांगितले. त्यावेळी सर्वांनाच धक्का बसला होता. कारण यापूर्वी दर्शनचे नाव कोणाला माहिती नव्हते. या हंगामात दर्शन फक्त पाणी आणायचे काम करत होता. पण या सामन्यात त्याला संधी मिळाली आणि त्याने या संधीचे सोने केले. कारण आपल्या पहिल्याच षटकात दर्शनने विकेट मिळवली होती. या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर चेन्नईचा ऋतुराज गायकवाड हा फलंदाजी करत होता. ऋतुराज या चेंडूवर मोठा फटका मारण्यासाठी गेला. पण त्याचे टायमिंग चुकले आणि त्याला मोठा फटका मारता आला नाही. ऋतुराजचा हा चेंडू हवेत उडाला. गिल हा झेल पकडण्यासाठी पुढे सरसावला. गिलने यावेळी कोणतीही चूक केली नाही आणि त्याने हा झेल पकडला. त्यामुळे गुजरातचा संघ हा सेलिब्रेशन करत होता. पण त्याचवेळी त्यांच्यासाठी एक वाईट बातमी आली. पंचांनी यावेळी ऋतुराजला बाद दिले नाही, कारण ज्यावेळी दर्शनने चेंडू टाकला तेव्हा त्याचा पाय लाइनच्या बाहेर होता आणि त्यामुळे पंचांनी नो बॉल दिला. नो बॉलवर फलंदाज फक्त रन आऊट झाला तर त्याला बाद दिले जाते. पण ऋतुराज झेल बाद झाला होता. त्यामुळे ऋतुराजला यावेळी नाबाद ठरवले गेले. पण हा बदला मात्र त्याने नंतर घेतला. दर्शनने त्यानंतर अजिंक्य रहाणेला १७ धावांवर बाद केले आणि आपला पहिली बळी मिळवला.